व्यंकटेश महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन

कर्मयोगी स्वर्गीय मदनलालजी बोहरा शेठजी यांच्या जयंतीनिमित्त श्री ना. बा . एज्युकेशन सोसायटी, एन. एस. एस. विभाग व स्वदेशी च्या सर्व शाखा आणि मेडिकल क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी येथे दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन श्रीकृष्णा बोहरा शेठजी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना सामाजिक कार्यात सक्रियपणे सहभागी होण्याचे आवाहन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय माने यांनी मार्गदर्शक या भूमिकेतून शिबिरासाठी सर्वतोपरी मार्गदर्शन केले. शिबिरात ६० रक्तदात्यांनी उत्साहपूर्वक रक्तदान करून समाजसेवेचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले. या कार्यक्रमाचे आयोजन शारीरिक शिक्षण संचालक श्री. अमीन बाणदार, एन.एस.एस. विभागप्रमुख  डॉ. एस. एन. जरंडीकर,  सदस्य श्री. डी. एस. कांबळे आणि मेडिकल क्लब प्रमुख श्री. एस. बी. मलघाण यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडले. रक्तदान शिबिरासाठी ना. बा. एज्युकेशन सोसायटीचे सर्व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व दात्यांचे आणि वैद्यकीय पथकाचे आयोजकांनी मनःपूर्वक आभार मानले. व्यंकटेश महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी वर्गाने या रक्तदान शिबिरांमध्ये सहभाग नोंदवला.

